
## बारामती येथील हवामानाची वैशिष्टे आणि कल

**(1986-2011)**


- उपरोक्त कालावधीतील दीर्घकालीन पाऊसाची सरासरी 588 मिलिमीटर आहे. (यापैकी जून ते सप्टेंबर या दरम्यान 71% आणि ऑक्टोबर ते डिसेंबर या दरम्यान 22%)




**सरासरी पर्जन्य प्रमाणाचे वितरण**

- वर्षातील 52 पैकी फक्त 6 आठवड्यात 5 मिमी पेक्षा जास्त उपयुक्त पाऊस (75% शक्यता) पडतो. या प्रमाण हवामान आठवड्याचे अ.क्र. याप्रमाणे आहेत, 23 (4-10 जून), 24 (11-17 जून), 37 (10-16 सप्टेंबर), 38 (17-23 सप्टेंबर), 39 (24-30 सप्टेंबर) आणि 40 (1-7 ऑक्टोबर).
- सर्वाधिक वार्षिक पाऊसाची नोंद 2009 (1145 मिमी) या वर्षी आणि सर्वात कमी पाऊसाची नोंद 2003 (151 मिमी) या वर्षी झाली. गेल्या 26 पैकी 7 वर्षामध्ये पाऊस नगण्य किंवा अपुरा (सरासरीच्या 20-59% कमी किंवा यापेक्षा कमी) तर ५ वर्षे पाऊस सरासरीपेक्षा 20% अधिक किंवा त्यापेक्षा जास्त झाल्याचे आढळून आले.
- वार्षिक पाऊसाच्या बाबतीत कोणताही स्पष्ट बदल दिसून येत नाही परंतु ऑगस्ट महिन्यातील पावसाळी दिवसांच्या संख्येमध्ये (विशेषत: 10-25 मि.मी. पाऊस प्रति दिन) वाढता कल दिसून येतो.

- दैनंदिन कमाल तापमान 40° से पेक्षा जास्त अनेकदा नोंदवले गेले आहे परंतू 42° से पेक्षा अधिक तापमानाची नोंद (सरासरी 1-2 दिवस/वर्ष) क्वचितच आढळून आली आहे. 42° से पेक्षा अधिक तापमानाची सर्वाधिक 8 वेळा 2000 मध्ये नोंदवली गेली. दैनंदिन कमाल तापमान 45° से पर्यंत केवळ दोन वर्षांमध्ये 2003 आणि 2004) नोंदवले गेले आहे.
- किमान तापमान 10° से पेक्षा खाली वर्षातुन सरासरी 5 दिवस असते, पण 2001 पासून हे अधिक वारंवार दिसून येत आहे.




| Year | Annual Tmean (°C) | Tmax (°C) | Tmin (°C) | Frequency | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Tmax > 40 °C | Tmin < 10 °C |
| 2012 | 26.3 | 40.5 | 10.2 | 4 | 0 |
| 2013 | 25.9 | 41.4 | 8.5 | 14 | 10 |
| 2014 | 25.3 | 40.0 | 7.0 | 0 | 8 |
| 2015 | 25.6 | 41.0 | 6.0 | 10 | 12 |
| 2016 | 25.5 | 42.0 | 8.0 | 18 | 14 |


भाकृअनुप-राअस्ट्रैप्रसं/Technical Folder No. 21 (2017)



संशोधन आणि संग्रहण

**सुनयन साहा, एस. के. बल, सुनिल पोतेकर, एम. पी. ब्राह्मणे आणि एन. पी. सिंह**

अधिक माहितीसाठी संपर्क

• **निदेशक** •

**भाकृअनुप-राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान**

(समतुल्य विश्वविद्यालय)

माळेगाव, बारामती 413 115, पुणे, महाराष्ट्र

☎ 02112-254057   🖷 02112-254056

www.niam.res.in


# कृषि हवामान वेधशाळेचा आढावा आणि बारामतीची वर्तमान जलवायू परिस्थिती



**भाकृअनुप-राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान**

भाकृअनुप ICAR   राअस्ट्रैप्रसं NIASM


(समतुल्य विश्वविद्यालय)

भारतीय कृषि संशोधन परिषद,
कृषि संशोधन आणि शिक्षण विभाग
कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार

माळेगांव, बारामती, पुणे 413 115, महाराष्ट्र, भारत

## परिचय


- सूक्ष्म पातळीवरील (उदा. मंडल किंवा गाव) कृषी-हवामान वैशिष्ट्यांची माहिती शेतीच्या वेळापत्रक नियोजनामध्ये शतेकऱ्यांना मदत करते आणि हवामानावर आधारित कृषि व्यवस्थापन पद्धतीमध्ये उपयुक्त ठरेल.
- बारामती हे ठिकाण पश्चिम महाराष्ट्राच्या पठारी भागातील कोरड्या व विषम हवामानाच्या अवर्षणप्रवण क्षेत्रा (एमएच 6) अंतर्गत येते.
- या भागातील पर्जन्यमान कमी असून देखील येथील स्थानिक विविधता अधिक आहे. तसेच काही किलोमीटर अंतरामध्ये पर्जन्यमानात प्रचंड चढ उतार दिसून येतो.
- हवामानातील बदल व हवामानातील विविधतेचे खरे स्वरूप ओळखण्यासाठी आणि योग्य हवामान अंदाज वर्तवण्यासाठी तसेच राष्ट्रीय नोंद संग्रह समृद्ध करण्यासाठी भारतातील कृषी हवामान वेधशाळांची संख्या आणि वितरण जाळे अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.




बारामतीचे स्थळनिर्देश

## ICAR-NIASM येथील हवामान निरीक्षण सुविधा

- पृष्ठभागीय हवामान निरीक्षणाची सुरुवात 2012 मध्ये एका स्वयंचलित हवामान केंद्र (AWS) च्या स्थापनेने झाली. सध्या या ठिकाणी संस्थेच्या वैज्ञानिक गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या मानक आणि विशेष उपकरणासह एक परीपूर्ण आणि कार्यक्षम कृषि वेधशाळा विकसित घाली आहे.
- **हवामान नोंदीचे घटक :** वारा (वेग आणि दिशा); तापमान (कमाल, किमान, कोरडे बल्ब आणि ओले बल्ब); 4 विविध खोलीवरील जमिनीतील ओलावा; पर्जन्य (सर्वसाधारण आणि स्वयंचलित); बाष्पीभवन; प्रखर सुर्यप्रकाश कालावधी व प्रकाशसंश्लेषणासाठी उपयुक्त प्रकाशकिरणे.
- **निरीक्षण नोंदी भारतीय प्रमाण वेळेनुसार :** हवेचे तापमान, वारा - स. 08 वा. 30 मि. आणि दु. २ वा. ३० मिनीटे. पर्जन्य, बाष्पीभवन आणि वारा - स. 07 वा. 32 मिनिटे आणि दु. 2 वा. 32 मिनीटे..




वेधशाळा उभारणीचा क्रम

## कृषि हवामानशास्त्र वेधशाळेसाठी मानक साधने


- तापमापके
  एकेरी स्टिव्हन्सन स्क्रीनमध्ये ठेवलेली (कमाल, किमान, कोरडी व ओली)



- पवन दिशा मापक



- पवन वेग मापक




- बाष्पीभवन मापक



- पर्जन्य मापक (सर्वसाधारण)



- पर्जन्य मापक (स्वयंचलित)



- कँबेल स्टोक्स सूर्यप्रकाशकाल मापक



- दव मापक

